**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.10 No.1** **Sept – Oct 2022**

# आंतरराष्ट्रीय मानव अधिकाराचा इतिहास

**डॉ. मधु खोब्रागडे**
सहयोगी प्राध्यापक जालना समाजकार्य महाविद्यालय
***Corresponding Author-* डॉ. मधु खोब्रागडे**
Email id : prof.khobragade@rediffmail.com
**DOI- 10.5281/zenodo.7386786**

**प्रस्तावना :**

मानवी अधिकार हे तसे प्रत्येक मनुष्याच्या जन्मजात सोबत आलेले आहे. मानवी अधिकारांचा जन्म पृथ्वीवर मनुष्यांच्या विकासासोबतच झालेला आहे. त्याच्या संकल्पनेला दोन आधार आहेत. एक म्हणजे राष्ट्रीय व दुसरा म्हणजे आंतरराष्ट्रीय विभिन्न काळात याचा प्रमुख आधार त्या—त्या देशातील धर्माचरणावर आधारलेला आहे. दया, क्षमा ही मानवी अधिकाराची प्रमुख अंगे आहेत. मानवी अधिकार संरक्षण संकल्पनेचा हळूहळू प्रथम लेखन नियमांमध्ये होत गेला या प्रक्रियेमध्ये आपणाला अनेक महत्त्वपूर्ण टप्पे दिसतील. इंग्लंडमध्ये इ.स. १२१५ मध्ये हक्कांची सणद तयार करण्यात आली व इ.स. १६२८ मध्ये हक्क विषयक निवेदन आणि इ.स. १६८९ मध्ये हक्कविषयक विधेयक इंग्लंडच्या संसदीय कायदेमंडळात मांडण्यात आले. यामुळे सर्व नागरिकांना विशेष अधिकार प्राप्त झाले. राज्यशक्ती ही स्वतंत्र मानवाच्या इच्छाशक्तीतून आकारास येत असते ही बाब अधोरेखित झाली. इसवी सन १७८९ मध्ये फ्रेन्स राज्यक्रांतीच्या मानव आणि नागरिक यांच्या हक्काचे घोषणापत्र तयार करण्यात आले या घोषणा पत्रात स्वातंर्त्य संपत्ती सुरक्षितता आणि शोषणाच्या विरोधातले अधिकार हे मानवाधिकार म्हणून संबोधण्यात आले. त्यानंतर अमेरिकेतील हक्कांची सनद एकंदरीत १९१९ व्या शतकामध्ये मानवी हक्कांचे तत्व म्हणून स्वीकार अनेक राज्यांनी केला.

शिवाय सामाजिक आणि आर्थिक हक्कांनाही मान्यता मिळू लागली यानंतर गुलामी प्रथेचे उच्चाटन मानवी हक्कामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर होऊ लागले इसवी सन १८१५ साली ऑस्ट्रिया देशाच्या व्हिएना परिषदेमध्ये गुलामी प्रथेचा आंतरराष्ट्रीय पातळीवर धिक्कार केला. गुलामी प्रथेच्या उच्चाटनाकरिता अनेक आंतरराष्ट्रीय करार झाले यामध्ये इसवीसन १८६२ अमेरिका मधील वॉशिंग्टन करार इसवीसन १८६७ आणि १८९० मधील ब्रूसिल्स परिषदेचे दस्तऐवज इ.स. १८८५ यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघ अस्तित्वात आला व राष्ट्रसंघामार्फत आंतरराष्ट्रीय मानवी हक्क संरक्षणाचे महत्त्वपूर्ण कार्य सुरू झाले यात राष्ट्रसंघाने स्त्री विक्री व्यापार बंदी लग्नाचे वय वाढवणे विविध देशात बालकल्याणासाठी योजना आखणे व राबवणे आदी महत्त्वाचे कार्य सुरू केले आंतरराष्ट्रीय कामगार संघटने द्वारे ही मानवाधिकार्याच्या विकासाच्या साठी सर्वात महत्त्वाचे पाऊल उचलले. मानवाधिकाराच्या रक्षणासाठी व प्रचार आणि प्रसारासाठी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती रोज वेल्थ यांनी जानेवारी १९४१ मध्ये संपूर्ण जगाला आव्हान केले की जगात प्रत्येक ठिकाणी व्यक्तीला चार प्रकारची स्वातंर्त्य मिळावेत पहिले म्हणजे भाषण स्वातंर्त्य दुसरे उपासनेचे स्वातंत्र तिसरे मूलभूत बाबींच्या पूर्ततेचे स्वातंर्त्य व चौथी भयमुक्त जीवन जगण्याचे स्वातंर्त्य या स्वातंर्त्यामुळे जगात शांती नांदू शकते असे विचार मांडले याच वर्षात उजवेल आणि ब्रिटनचे प्रधानमंत्री वेतन चर्चिल यांनी अटलांटिक घोषणापत्र तयार केले. याच घोषणा पत्रात स्वातंत्रतेच्या स्थापनेसाठी युद्धाचे लक्ष बनविले गेले.

दुसरा महायुद्धानंतर जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना करण्यात आली. विविध देशांना याचे सदस्य देण्यात आले संयुक्त राष्ट्रसंघाच्या घोषणा पत्राच्या प्रस्तावने सर्व सदस्य राष्ट्रने असा संकल्प केला की आम्ही प्रमुख मानवी अधिकार व्यक्तीचा महिमा व मूल्य मोठ्य आणि छोट्य सर्व देशातील स्त्री—पुरुषांना समान अधिकार प्राप्त करून देण्यासाठी आम्ही संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्य देश एकत्र येऊन प्रयत्न करण्याचा संकल्प करत आहोत याच घोषणा पत्रानुसार संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक आणि सामाजिक समितीद्वारे १९४६ ला श्रीमती एलिना रुजवेल यांच्या अध्यक्षतेखाली मानवी हक्क आयोग स्थापन करण्यात आला संयुक्त राष्ट्र संघटनेचे मानवी हक्क व स्वातंत्र विषयक आंतरराष्ट्रीय विधेयक तयार करण्याची कामगिरी मानवी हक्क आयोग यांच्याकडे सोपवली या आयोगाने दिनांक दहा डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्काबाबत आंतरराष्ट्रीय विधेयकाचा मसुदा तयार करून आपली सर्वसाधारण सभा घेतली व सर्वानुमते मानवाधिकाराच्या जागतिक घोषणा पत्राच्या सुरुवातीच्या काळात या घोषणा पत्राला संशयाने बघण्यात येऊ लागले परंतु जेव्हा महासभेने दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाविरुद्ध मोहिमा आपली तेव्हा जन्म तयार होऊन मानवाधिकार्याच्या जागतिक घोषणापत्र ला सत्य मानण्यात आले व आपल्या भारत देशासह जगातील अनेक देशांनी या घोषणा पत्राचा अंतर्भाव आपल्या देशाच्या राज्यघटनांमधून केला.

**भारतातील मानवाधिकाराची पार्श्र्वभूमी :**

भारतात मानवाधिकाराची संकल्पना तशी नवीन नाही स्वातंर्त्यपूर्व काळात आपल्या देशात मानवी अधिकार जाणणारे, जोपासणारे अनेक विचारवंत सामाजिक कार्यकर्ते होऊन गेले त्यात महात्मा ज्योतिबा फुले राजर्षी शाहू महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचा संदर्भ देता येतो कारण या महान मानवी अधिकार सांगणाऱ्या कार्यकर्त्यांमुळे संपूर्ण समाज जागृत होऊन त्यांचा विकास झाला आहे व होत आहे त्यांच्या मानवी अधिकारात येणाऱ्या कामाचा खालील प्रमाणे आढावा देता येईल.

**महात्मा ज्योतिबा फुले यांचे मानवाधिकार संबंधित कार्य :**

इ.स. १८४८ म्हणजे तेव्हाचा काळ हा तसा भारतात स्वातंर्त्य पूर्वीच्या काळ होता वर्णव्यवस्था होती अस्पृश्यता पाळली जात होती वर्णवस्थेत ब्राह्मण सक्रिय वैशिष्ट्य सूत्र चार वर्ण होते ब्राह्मणांना विद्या घेण्याचा व देण्याचा अधिकार होता राज्याचे संरक्षण करण्याचा अधिकार वैशांना व्यापार करण्याचा अधिकार व शेवटी सुधारणा वरील तिन्ही वर्णाची चाखरी करण्याचा अधिकार हिंदू धर्मातील पवित्र मानल्या जाणाऱ्या मनुस्मृति ग्रंथांनी प्राप्त करून दिला होता वरील प्रमाणे सर्व चालेल ही परिस्थिती अशी अत्यंत वाईट होती. १८४८ मध्ये अस्पृश्यांच्या मुलींसाठी बुधवार पेठेत पहिली शाळा सुरू केली. जेणेकरून मुलीशीतील व त्यांना त्यांच्या अधिकार समजतील व त्यांचा विकास होईल त्याचबरोबर महात्मा फुले यांनी १८५३ मध्ये मित्रांच्या सहकार्याने अनुसूचित जातींच्या मुला—मुलींना शिक्षण मिळावे या हेतूने मंडळी या नावाची शिक्षण संस्था स्थापन केली. या त्यांच्या कार्याला समाजातून फार विरोध झाला परंतु ते कोणालाही न जुमानता त्यांचे कार्य चालू होते. १८६४ मध्ये बालहत्या प्रतिबंधक ग्रहाची स्थापना केली व होत असलेली बालहत्या थांबवण्याचा प्रयत्न केला त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. मानवाधिकाराच्या क्षेत्रातले त्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे १८६८ मध्ये जेव्हा महात्मा ज्योतिबांच्या वडिलांचे निधन झाले त्याच वर्षी आपल्या घरचा पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला या देशात तेव्हा अस्पृश्यांना सार्वजनिक जागी किंवा विहिरीवर पिण्याचे पाणी भरण्याचे देखील स्वातंर्त्य नव्हते या स्वातंर्त्याच्या त्यांनी उपभोग घ्यावा हा मानवी हक्काचा लढा आयुष्यभर चालू ठेवला.

**राजर्षी शाहू महाराजांचे मानवाधिकार संदर्भातील कार्य :**

इ.स. १८७४ ते १९२२ चा म्हणजे स्वातंर्त्यपूर्व चा काळ आहे तेव्हा ही जातीभेद अस्पृश्यता मोठ्य प्रमाणात पाळली जात होती. लोकांना शिक्षण नव्हते तेव्हा अशा प्रतिकूल वातावरणात राजश्री शाहू महाराजांनी अस्पृश्य समाज

सुशिक्षित झाल्याशिवाय त्यांचा सार्वजनिक विकास होणार नाही म्हणून त्यांनी १९०७ मध्ये मिस क्लार्क बोर्ड या नावाचे वस्तीगृह उघडले व शिक्षणाची योग्य सेवा दिली. बहुजनांच्या राजकीय हक्कासाठी त्यांनी डेक्कन रयत संस्थेची स्थापना केली. राज्यातील सरकारी नोकरीत मागासवर्गीयांना ५० टक्के आरक्षण देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला राज्यात सार्वजनिक शाळेत दवाखान्यात पानवटे विहिरीवर अस्पृश्यता पाळली जाऊ नये म्हणून त्यांनी कायदे केले १९१८ मध्ये अस्पृश्यांकडून वेडबिगारी पद्धतीने कामे करून घेण्यात कायद्याने बंदी घातली व आयुष्यभर मानवाधिकाराचे कार्य असेच चालू ठेवले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवाधिकार विषयक कार्य :**

१९२० मध्ये मूकनायक नावाचे पाक्षिक काढून अस्पृश्यांच्या सामाजिक व राजकीय हक्कांची लढाई बाबासाहेबांनी सुरू केली तशी या काळात बोटावर मोजणे इतकाच अस्पृश्य समाजशास्त्र होता देशात स्पृश्य अस्पृश्यता भेदभाव नष्ट व्हावा स्वातंत्र समता बंधुत्व व शांती प्रस्थापित व्हावी यासाठी त्यांनी सदैव प्रयत्न केले त्यांनी बहुजनांच्या शैक्षणिक विकास करण्यासाठी १९४६ मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. दृश्य अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी देशातील संपूर्ण बहुजनांना एकत्र करून तसेच जन्म तयार करून वर्षानुवर्षेच्या तलावाचे पाणी पिण्याचे स्वातंर्त्य नव्हते ते स्वतंत्र तो अधिकार त्यांना २० मार्च १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रह करून मिळवून दिला. २५ डिसेंबर १९२७ रोजी हिंदू धर्मातील पवित्र मानल्या जाणार्‍या मनुस्मृति ग्रंथाचे सर्वांसमोर दहन केले आणि पद दलितांना सांगितले की तुम्ही गुलाम नाहीत या सुंदर अशा सृष्टीचे स्वतंत्र मानव आहात. दलितांच्या हक्कासाठी आणि न्यायासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. त्याचप्रमाणे धार्मिक स्वातंर्त्याच्या अधिकारात ज्या हिंदू मंदिरात अस्पृश्य समाज दर्शनासाठी गेला असता देव बाटत होता हा खुर्चट प्रकार बंद करण्यासाठी या खंबीर मानवाधिकार रक्षकाने २ मार्च १९३० रोजी जन्म तयार करून एकत्र येऊन नाशिकच्या काळाराम मंदिराचे प्रवेशद्वार सर्वांसाठी खुले करून दिले याची नोंद मानवाधिकाराच्या कार्याच्या इतिहासात होणे गरजेचे आहे. स्वातंर्त्य भारताचे संविधान लिहीत असताना संविधानाच्या भाग तीन अनुच्छेद १२ ते ३५ मध्ये मूलभूत मानवी अधिकार समाविष्ट केले आहे आजही मानवी अधिकाराची लढाई कायम सुरू आहे.

**भारतातील मानवाधिकार संरक्षण कायदा :**

सन १९५० पासून भारतात मानवी हक्क संरक्षणासाठी विशेष प्रयत्न केले जात असल्याची प्रचिती भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार दिसून येईल राज्यघटनेचा भाग तीन मध्ये अनुच्छेद १२ ते ३५ मध्ये मूलभूत मानवी अधिकारात समतेचा अधिकार स्वातंर्त्याच्या अधिकार सोसनाविरुद्धचा अधिकार धार्मिक स्वातंर्त्याच्या अधिकार सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार संपत्तीच्या हक्क व शेवटी घटनात्मक उपायांचा अधिकार्‍यांचा समावेश होतो.

भारतातील सामाजिक स्थिती विचारात घेता मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ पारित केलेल्या या कायद्यान्वये मानवाधिकार आयोगाची स्थापना केली राष्ट्रासाठी राष्ट्रीय मानवी आयोग व राज्यासाठी राज्य मानवी आयोग स्थापन करण्यात आला. या आयोगामार्फत देशातील कोणतीही व्यक्ती मानव हक्क उल्लंघन प्रकरणे सामाजिक न्याय मानवी हक्क आयोगाकडे मागू शकते. आज देशात मानवाधिकाराचे कार्य विविध संघटना व त्यांचे मानवी अधिकार कार्यकर्ते उत्तम प्रकारे करत असल्याचे आपल्याला दिसून येते

**संशोधनाचे उद्देश :**

१) मानवी अधिकार हा लोकशाहीसाठी किती महत्त्वाचा आहे हे अभ्यासने.

२) मानवी अधिकारासंदर्भात नागरिकांचे जनमत अभ्यासने.

३) मानवी अधिकारांची शासन व प्रशासनात झालेली दशा व त्याचे कारण हे अभ्यासने.

**गृहीत कृत्य :**

१) मानव अधिकार संरक्षण कायद्याची व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही.

२) शासन आणि प्रशासनात मानवाधिकार संबंधी दुर्लक्ष केले जाते.

**निष्कर्ष :**

१) मानवाधिकाराची दिशा श्रेष्ठ आहे म्हणजे जागतिक व देश पातळीवर मानवी हक्क कायदे अस्तित्वात आले आहेत परंतु मानवी हक्क आयोगाच्या व शासनाच्या उदासीनतेमुळे कायद्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही.

२) मानवी अधिकार जरी सर्वांना माहीत असले तरी आज पावलोपावली मानवाधिकाराचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होताना दिसते त्यामुळे मानवी हक्काचे शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे असे दिसून येते.

३) शासन आणि प्रशासनात राजकीय दबाव तंत्रामुळे सर्वसामान्य माणसाला त्याच्या मूलभूत अधिकाराचा अपभोग घेताना मोठ्या प्रमाणात अडचणी येतात असे दिसून आलेले आहे.

४) मानवी हक्क संघटना व त्याच्या जाहीरनाम्याची योग्य असे अंमलबजावणी होण्यासाठी कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे.

**संदर्भसूची :**

१) मानवी हक्क प्रश्न व उत्तरे – लेखक लिया लेविन अनुवाद विकास देशपांडे

२) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ – ॲड. अभया शेलकर

३) मानवाधिकार और महिला उतपिडन – रागिनी श्रीवास्तव

४) मानव सन्मान के लिए मानवाधिकार – अमनेस्टी इंटरनॅशनल प्रकाशन

५) महाराष्ट्रातील समाज सुधारक – विद्याभारती प्रकाशन